महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग

**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय**

४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.

Website-https://mahaawaas.org
दूरध्वनी क्र.०२२-२७५६१८२४/ टोल फ्री क्र. १८०० २२ २०१९
Email ID-directoriayruralhousing@gmail.com

जा.क्र./SMURH/IT/बैठक/२०२३/१७९३ दि: ०२/११/२०२३

प्रति,

**कार्यकारी अध्यक्ष,**
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व).

**विषय :- प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांचा विभागीय बैठकांद्वारे आढावा.**

संदर्भ :- मा. सचिव, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचेमार्फत आयोजित करण्यात आलेली PRC बैठक दि.०२/११/२०२३.

उपरोक्त संर्भान्वये, मा. सचिव, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचे अध्यक्षतेखाली दि.०२/११/२०२३ रोजी PRC बैठक संपन्न झाली. मा. प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग या बैठकीस उपस्थित होते. सदर बैठकीमध्ये राज्यातील प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मधील घरकुल पूर्णत्वाची व हफ्ते वितरणाची गती अतिशय कमी असल्याबाबत मा. सचिव, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी तीव्र नाराजी व असमाधान व्यक्त केले आहे.

त्यानुषंगाने प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनांचा आढावा घेण्यासाठी, **मा.प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार, दि.०८/११/२०२३ रोजी** उपायुक्त (विकास), मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्या खालील वेळापत्रकानुसार व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे विभागीय आढावा बैठका आयोजित करण्यात आल्या आहेत.

| अ.क्र. | विभाग | वेळ |
|---|---|---|
| १ | नाशिक, अमरावती व नागपूर | सकाळी ११.०० वा. |
| २ | कोंकण, पुणे व औरंगाबाद | दुपारी ०३.०० वा. |

**सदर बैठकीसाठी विषय सूची खालील प्रमाणे-**

१. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अपूर्ण घरकुले Delayed Houses सह पूर्ण करणे.

२. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत प्रलंबित हप्ते वितरीत करणे.

३. राज्य पुरस्कृत योजनांतर्गत उर्वरीत घरकुलांना मंजूरी देणे व अपूर्ण घरकुले पूर्ण करणे.

४. आधार सिडींग व आधार Authentication पूर्ण करणे.

५. ग्रामीण गृहनिर्माण अभियंता (RHE) यांच्या मानधन अदा करणे.

तरी सदर बैठकीस आपण स्वतः उपस्थित राहून आपले अधिनस्त असलेले प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांना उपस्थित राहण्यासाठी आपल्या स्तरावरुन सूचित करावे.

सदर बैठकीकरीता आवश्यक VC Link आपणांस अवगत करण्यात येईल.

**(डॉ.राजाराम दिघे)**
संचालक,
राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण
महाराष्ट्र राज्य

**प्रत:**

१. मा. प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व) यांना माहितीस्तव.

३. उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व) यांना माहिती व उपस्थित राहण्यासाठी.

४. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, (सर्व) यांना माहिती व उपस्थित राहण्यासाठी.

५. गट विकास अधिकारी (पंचायत समिती), जिल्हा परिषद, (सर्व) यांना माहिती व उपस्थित राहण्यासाठी.